पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय

कार्यपत्रिका क्रमांक १२

सभावृत्तांत

दिनांक:- १२/०२/२०१६ वेळ.दुपारी १२.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा."फ" प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक १२/०२/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता "फ" क्षेत्रीय कार्यालयातील "राजर्षी शाहु महाराज सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या व स्विकृत सदस्य उपस्थित होते.

१. मा.बो-हाडे शुभांगी संजय सभापती
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापू
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.जाधव साधना रामदास
७. मा.जाधव राहुल गुलाब
८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
९. मा.पवार संगीता शाम
१०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
११. मा.तानाजी विठ्ठल खाडे
१२. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
१३. मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
१४. मा.भालेकर पंकज दत्तात्रय
१५. मा.पवार जितेंद्र हनुमंत
१६. मा.भालेकर प्रविण महादेव

याशिवाय दिलीप गावडे (क्षेत्रीय अधिकारी), श्री. विजय वाघमारे प्रशासन अधिकारी, श्रीम.प्रभावती गाडेकर (कार्यालयीन अधिक्षक), श्री.संदेश चव्हाण (कार्यकारी अभियंता विद्युत), श्री. प्रदीप पुजारी (प्र.कार्यकारी अभियंता जलनि:सारण / उपअभियंता झोनिपू), श्री.पी.जी.जाधव (लेखाधिकारी), श्री.नायकवाडी बी.एस. (लेखापाल), श्री.हनुमंत शिंदे उपअभियंता (जलनि:सारण), श्री.नरोटे सुनिलदत्त (उपअभियंता स्था) श्री. विजय शिंदे उपअभियंता (पाणीपुरवठा), श्री.व्ही.बी.माने उपअभियंता (नगररचना), श्री. जाधव व्ही.के. (उपअभियंता

स्था.उद्यान), श्री. शिर्के डी.जे. (मुख्य आरोग्य निरीक्षक), श्री.कुलकर्णी एस.एस. (मुख्य आरोग्य निरीक्षक),श्री.मोरे सी.सी.हॉर्टी सुपरवायझर, श्री.ई.एच.बंडवल हॉर्टी सुपरवायझर, श्री.तानाजी गायकवाड हॉर्टी सुपरवायझर, श्री.शितोळे एस.के. क.अभि. झोनिपू स्था, श्री.कुलकर्णी आर.पी.,श्री.रोकडे बी.जी.,क.अभियंता, श्री.माळी एस.के. आरोग्य निरीक्षक, श्री.नंदकिशोर वाघ मुख्य लिपीक, श्री. गिरमकर तुकाराम मुख्य लिपीक, कु.प्राजक्ता गव्हाणे (क.अभियंता स्था.उद्यान),श्री.नांगरे एस.ए.क.अभियंता विद्युत श्री.सुभाष पवार ( क्रीडा पर्यवेक्षक), इ. अधिकारी सभेस हजर होते.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र.१** राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती महोत्सव सन २०१५ अनुषंगाने मंडप विषयक कामे करणेकामी अंदाजपत्रकीय र.रु. ४,९९,७००/- च्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता देणेबाबत –
मा.पौर्णिमा सोनवणे व मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव

**विषय क्र.२** महापौर चषक राज्यस्तर सॉफ्टबॉल स्पर्धा २०१५ अनुषंगाने मंडप विषयक कामे करणेकामी अंदाजपत्रकीय र.रु. १,००,०००/- च्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता देणेबाबत
मा.पौर्णिमा सोनवणे व मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव

**विषय क्र.३** महापौर चषक १४ वी ज्युनिअर राज्यस्तर धनर्विद्या स्पर्धा २०१५-१६ अनुषंगाने मंडप विषयक कामे करणेकामी अंदाजपत्रकीय र.रु. ३,३६,८००/- च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.
मा.पौर्णिमा सोनवणे व मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव

ठराव क्र. ३२ विषय क्र.१
दि. १२/०२/२०१६ विभाग .......
सुचक:- मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित अनुमोदक:- मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन
संदर्भ:- मा.स्वाती साने यांचा दि. ८/०१/२०१६ चा प्रस्ताव
विषय:- चिखली मधील रिव्हर रेसिडेन्सी चौकाला “कै.नामदेव दगडू साने चौक” असे नामकरण करणेबाबत.

विषय क्र. १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र. ३३ विषय क्र.२

दि. १२/०२/२०१६ विभाग .......

सुचक:- मा.साधना जाधव अनुमोदक:- मा. राहुल जाधव

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील क्र.फक्षेका/लेखा/ नि /कावि / ५१ /२०१६

दि.४/०२/२०१६ चा प्रस्ताव

"फ" क्षेत्रीय कार्यालयाचे सन २०१५ – १६ चे सुधारित व सन २०१६ -१७ चे मूळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहेत. सदरचे अंदाजपत्रक मा.प्रभाग समिती यांचे अवलोकनार्थ ठेवणे आवश्यक आहे. तरी फ प्रभाग समितीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

ठराव क्र. ३४ विषय क्र.३

दि. १२/०२/२०१६ विभाग .......

सुचक:- मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे अनुमोदक:- मा.मंदाकिनी अर्जुन ठाकरे

संदर्भ:- मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे व मा.मंदाकिनी अर्जुन ठाकरे चा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी प्रमाणे राजश्री छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त मोहत्सवाचे आयोजन साई उद्यान, चिंचवड येथे दि. २६/०६/२०१५ ते २७/०६/२०१५ रोजी करण्यात येणार आहेत. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रस्तुत ठिकाणी आवश्यक ती मंडप व्यवस्था करणेबाबत मा.आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी त्यांचेकडील आदेश क्र.माजसं/५/कावि/३९/२०१५,दि.२३/६/२०१५ अन्वये आदेश देणेत आलेले आहेत. सदर कार्यक्रमांच्या अनुषंगाने प्रस्तुत ठिकाणी मंडप विषयक कामे करणे, उदा. मंडप, खुर्च्या, टेबल, झालर, रोस्टम आदी कामे करणे आवश्यक आहे. सदर बाबींचा समावेश असलेल्या कामाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे व त्यांची अंदाजपत्रकीय र.रु. ४,९९,७००/- रुपये इतकी येत आहे.

सबब कामाची तातडीची आवश्यकता लक्षात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड मधील प्रकरण ५(२) २ नुसार प्रस्तुत कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेपर्यंतच्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र. ३५ विषय क्र.४

दि. १२/०२/२०१६ विभाग .......

सुचक:- मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे अनुमोदक:- मा.मंदाकिनी अर्जुन ठाकरे

संदर्भ:- मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे व मा.मंदाकिनी अर्जुन ठाकरे चा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या व महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल असोसिएशन व पुणे जिल्हा सॉफ्टबॉल असोशिएशन यांच्या मान्यतेने आणि युनाटेड फ्रेडस स्पोटर्स अकॅडमी, संत तुकारामनगर,पिंपरी यांच्या सहकार्याने दि. २३/११/२०१५ ते दि. २५/११/२०१५ या काळात वॉर्ड क्र.२८ मासुळकर कॉलनी येथील डॉ. हेगडेवार क्रीडा संकुलात महापौर चषक राज्यस्तर

सॉफ्टबॉल स्पर्धा २०१५ आयोजित करण्यात आलेल्या आहेत. मा.अतिरिक्त आयुक्त सो.यांनी त्यांचेकडील आदेश क्र. क्रीडा/७अ/कावि/८५५/२०१५दि. ११/१२/२०१५ अन्वये आदेश देणेत आलेले आहे. सदर कार्यक्रमांच्या अनुषंगाने प्रस्तुत ठिकाणी मंडप विषयक कामे करणे, उदा.स्टेज,प्रेक्षक गॅलरी, रोस्टम, झालर, टेबल, मंडप खुर्ची, कमाणी, तसेच खेळाडूंसाठी राहण्याची व्यवस्था इत्यादी कामे करणे आवश्यक आहे. सदर बाबींचा समावेश असलेल कामाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे व त्यांची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,००,०००/- इतकी येत आहे.

सबब कामाची तातडीची आवश्यकता लक्षात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड मधील प्रकरण ५(२) २ नुसार प्रस्तुत कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेपर्यंतच्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्र. ३६ विषय क्र.५

दि. १२/०२/२०१६ विभाग .......

सुचक:- मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे अनुमोदक:- मा.मंदाकिनी अर्जुन ठाकरे

संदर्भ:- मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे व मा.मंदाकिनी अर्जुन ठाकरे चा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या व महाराष्ट्र राज्य आर्चरी असो.पिंपरी चिंचवड यांचे मान्यतेने कै. आण्णासाहेब मगर स्टेडियम नेहरुनगर पिंपरी येथे माहे जानेवारी २०१६ मध्ये महापौर चषक १४ वी ज्युनिअर राज्यस्तर धनर्विद्या स्पर्धा आयोजित करणे आली. मा.अतिरिक्त आयुक्त सो.यांनी त्यांचेकडील आदेश क्र.क्र.क्रीडा/७अ/कावि /८५७/२०१५ दि. १५/१२/२०१५ अन्वये आदेश देणेत आलेले आहे. सदर कार्यक्रमांच्या अनषंगाने प्रस्तुत ठिकाणी मंडप विषयक कामे करणे, उदा.स्टेज,प्रेक्षक,गॅलरी, रोस्टम,झालर, टेबल, मंडप, खुर्ची,कमाणी, तसेच खेळाडूंसाठी राहण्याची व्यवस्था इत्यादी कामे करणे आवश्यक आहे. सदर बाबींचा समावेश असलेल्या कामाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे व त्यांची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ३,३६,८००/- इतकी येत आहे.

सबब कामाची तातडीची आवश्यकता लक्षात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड मधील प्रकरण ५(२) २ नुसार प्रस्तुत कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेपर्यंतच्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(बो-हाडे शुभांगी संजय)
सभापती
फ प्रभाग समिती

क्रमांक:- फक्षेका/सभा/कावि/ २१/२०१६

दिनांक:- २०/०२/२०१६

(प्रशासन अधिकारी)
सचिव सभाशाखा
फ क्षेत्रीय कार्यालय